**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,**

**डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला भारत मौसम विभाग**

**ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsakola@yahoo.com**

**अमरावती कृषी हवामान सल्ला** **शुक्रवार दिनांक – २७.१२.२०१९**

| हवामान घटक | हवामान अंदाज (दिनांक २८ डिसेंबर २०१९ ते ०१ जानेवारी २०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | २८/१२ | २९/१२ | ३०/१२ | ३१/१२ | ०१/०१ |
| पाऊस (मिमी) | ० | ० | ० | १ | १ |
| कमाल तापमान (अं.से.) | २६ | २७ | २६ | २४ | २३ |
| किमान तापमान (अं.से.) | ११ | ११ | १२ | १३ | १४ |
| ढग स्थिती (आकाश) | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | ढगाळ | ढगाळ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ७० | ६८ | ७० | ७५ | ८५ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६३ | ६० | ६२ | ७१ | ७२ |
| वा-याचा वेग (किमी / तास) | २ | २ | २ | २ | २ |
| वा-याची दिशा | ६९ | ९० | १०९ | १०८ | ११४ |

| हवामानाचा इशारा | सध्यस्थितीत जिल्यात दिनांक २७-२९ डिसेंबर रोजी हवामान बहुतेक ठिकाणी कोरडे राहील आणि दिनांक ३० - ३१ डिसेंबर दरम्यान तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. तसेच पुढील दोन दिवसांनी २-३ अंशांनी किमान तापमानात घट होणार आहे. | |
|---|---|---|
| पिकांचे नाव | अवस्था | कृषि हवामान सल्ला |
| सर्व पिक | पेरणी | सध्यस्थितीत जिल्यात दिनांक २७-२९ डिसेंबर रोजी हवामान बहुतेक ठिकाणी कोरडे राहील आणि दिनांक ३० - ३१ डिसेंबर दरम्यान तुरळक हलका ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे व पुढील दोन दिवसांनी २-३ अंशांनी किमान तापमानात घट होणार आहे. रब्बी पिकांना आवश्यकतेनुसार संरक्षित ओलीत द्यावे. |
| कपाशी | पात्या / बोंड | सध्यस्थितीत जिल्यात दिनांक २७-२९ डिसेंबर रोजी हवामान बहुतेक ठिकाणी कोरडे राहील आणि दिनांक ३० - ३१ डिसेंबर रोजी हलका ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे तरी शेतकरी बंधूंनी लवकरात लवकर कापाशाची वेचणी करून कोरड्या ठिकाणी संरक्षित साठवणूक करावी.<br>गुलाबी अळीचा प्रादुर्भाव आढळयास कमीत कमीत दोन प्रती एकर या प्रमाने फेरोमन सापळे लावावीत. तसेच गुलाबी बोंड अळीच्या व्यावास्थापानासाठी ५ % निंबोळी अर्काची फवारणी करावी किंवा अझाडीरेक्टीन प्रती १५०० पीपीएम @ २५ मिली प्रती १० लिटर याप्रमाणे फवारणी करावी. गुलाबी बोंड आलीच प्रादुर्भावाचे प्रमाण १० % पेक्षा जास्त असेल तर इमामेक्टीन बेंझोएट ५ एस. जी. ३ ग्रॅम किंवा प्रोफेनोफोस (४०%) + सायपरमेथ्रीन (४%) @ २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. कपाशी पिकाचे फरदड घेतल्यास शेंदरी बोंडअळी सोबत इतर अळयांना खाद्य मिळाल्यामुळे त्याचा प्रधुर्भाव जास्त राहतो व त्यांचा परिणाम पुढील हंगामातील पिकावर लवकर होता, त्यामुळे फरदड घेणे शक्यतोवर टाळावे. |
| तूर | फुल धारणा अवस्था | जिल्यात दिनांक २७-२९ डिसेंबर रोजी हवामान बहुतेक ठिकाणी कोरडे राहील. त्यामुळे तूर पिकात उपलब्धतेनुसार आवश्यक असल्यास संरक्षित ओलीत द्यावे. दिनांक ३० - ३१ डिसेंबर दरम्यान तुरळक हलका ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे तरी तुरीवर फवारणी करावयाची असल्यास लगेच करावी. तुरीवरील शेंगा पोखरणाऱ्या (हेलीकोवरपा) अळीच्या व्यवस्थापनासाठी ५ % निंबोळी अर्काची फवारणी करावी. तुरीवरील शेंगा पोखरणाऱ्या (हेलीकोवरपा) अळीच्या व्यवस्थापनासाठी किडींनी आर्थिक नुकसानीची |

| | | |
|---|---|---|
| | | पातळी गाठल्यानंतर (१० ते २० अळया / १० झाडे) इमामेक्टीन बेंझोएट ५ एस. जी. ३ ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| गहू | वाढ | मर्यादित पाणी पुरवठा असल्यास एकच ओलीत ४०-४२ दिवसांनी, दोन ओलीतसाठी १८-२० व ६०-६५ दिवसांनी, तीन ओलीतसाठी १८-२०, ४०-४२ व ६०-६५ दिवसांनी संरक्षित ओलीत द्यावे. पिकास पेरणीवेळी ४०;४०;४० किलो नत्र; स्फुरद;पालाश / हे रासायनिक खत द्यावे तसेच उरलेले वरखत नत्र ४० किलो / हे १८-२० दिवसानंतर पहिल्या पाण्या च्या वेळी द्यावे. |
| हरभरा | वाढ | मर रोगाचा शेतात प्रादुर्भाव दिसताच रोगट झाडे उपटून नष्ट करावीत. ट्रायकोडर्मा शेणखतात मिसळून द्यावा. वेळेवर पेरणी केलेले पिक सुमारे ४५ ते ६० दिवस तणमुक्त असावे. गरज पडल्यास एक निंदन करून तण वेवास्थापन करावे. बागायती हरभरा पिकावरील ओली मुळकुज व कॉलररॉट दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी योग्य ते उपाय करावा. हरभरा जाकी - ९२१८ व विजय या वाणास शक्य तोवर तुषार सिंचन पद्धतीने संरक्षित ओलित करावे. हरभरा पिकात एकरी ८-१० पक्षी थांबे लावल्यास अळयांची संख्या कमी होण्यास मदत होते. |
| करडई | वाढ | करडई पिकाची आंतरमशागत करावी व गरज पडल्यास एक निंदन करून तण वेवस्थापन करावे. करडई पिकामध्ये रस शोषण करणाऱ्या मावा किडीच्या नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० % प्रवाहि १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| रब्बी ज्वारी व मुक्का | वाढ | रब्बी ज्वारी पिकात मावा व तुडतुडे यांच्या वेवास्थापनेसाठी पिकाच्या नाजूक अवस्थेत पाण्याचा ताण पडू देयू नये. रब्बी ज्वारी पिकास रासायनिक वरखत उरलेले नत्र ४० किलो / हे २५-३० दिवसानंतर द्यावे. रब्बी मक्का पिकास रासायनिक वरखत उरलेले नत्र ४० किलो / हे २५ - ३० दिवसानंतर द्यावे. |
| फळझाडे | वाढ | डाळिंब पिकावरील तेल्या रोगाच्या नियत्रंणाकरिता कॉपर हायड्रोक्साआईड २५ ग्रॅम + स्त्रेप्तोमायसीन सल्फेट ५ ग्रॅम किवां ब्रोनोपोल* ५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी फवारणी करतांना स्टीकरचा वापर करावा. तीव्रतेनुसार १५ दिवसांनी पुन्हा फवारणी करावी. मिरची पिकावरील शेंडेमर व फळसड रोगाच्या नियत्रंनाकरिता डायफेनकॉनाझोल २५ ईसी ५ मिली १० लिटर पाण्यात किवां अझोक्सोस्त्रोबीन २३% एससी १० मिली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. जिल्यात दिनांक १४-१८ डिसेंबर रोजी हवामान बहुतेक ठिकाणी कोरडे राहील. त्यामुळे डाळिंबवर फवारणी करावयाची असल्यास लगेच करावी. |
| कांदा | लागवड | कांदा पिकाची ६-८ आठवडयाचे रोपे सपाट वाफ्या मध्ये १० * १० सें. मी. अंतरावर जानेवारीच्या पहिल्या पंधरवड्यात लागवड करावी. |
| पशु व पक्षी | | जिल्ह्यात किमान तापमानात घट होत असल्यामुळे कुकुटपालन शेडमध्ये दोन्ही बाजूच्या जाळयांना पडदे किंवा बारदाना लावावा तसेच रात्रीच्या वेळी शेड मध्ये बल्ब लावावेत. शरीरातील तापमान टिकविण्याकरिता उर्जायुक्त खाद्यपदार्थ उदा.स्निग्ध पदार्थ, प्रथिने यांचे खाद्यातील प्रमाण वाढवावे. हवानात आचक बदल जनावरांना चा-यासाठी, पाण्याच्या उपलब्धतेनुसार एकदल वर्गीय (मका, ओट) व व्दिदल वर्गीय (लसुन, बरसीम) घासाची पेरणी करावी |

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून, नानाजी देखमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय, मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.